"नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास"

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वाणिज्य विद्याशाखेअंतर्गत वाणिज्य विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादरकरावयाचा पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

प्रा.कर्डक संतोष एकनाथ
एम.कॉम. बी.एड. सेट, एम. ए.(अर्थशास्त्र)
सहाय्यक प्राध्यपक, वाणिज्य विभाग,
एस. व्ही.के.टी.कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय देवळी कॅम्प नाशिक.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पी.एस.जाधव
एम.कॉम. पीच.डी.
सहाय्यक प्राध्यपक, वाणिज्य विभाग,
बहिरजी स्मारक महाविद्यालय वसमत, नांदेड

मे २०१९

सारांश:

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो, कारण भारतात६,४९,४८१लाख खेडी आहेत. भारताला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी जवळ जवळ-१७ टक्के जी.डी.पी. हा कृषी उत्पन्नातून मिळतो.असे असले तरी भारतीय समाजव्यवस्थेत जात हा प्रमुख घटक असल्याचे दिसून येते.प्राचीन काळापासूनच व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी जात हा घटक प्रमाण मानला जातो.त्यामुळे भारतातील असणाऱ्या विविध जातींपैकी अनुसूचित जातीच्या लोकांकडे ज्या शेत जमिनी आहेत, त्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.त्याचबरोबर त्यांच्याकडे पुरेसे भांडवल देखील नाही.म्हणजेच त्यांना शेतीसाठी आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात अनुसूचित जातीच्या प्रजातींचे प्रमाण ४९.५० टक्के होते. महाराष्ट्रात हे प्रमाण ११.०८ टक्के होते. २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या ३३,६१,२९२ इतकी होती, पैकी ६,४०,४८३ इतकी लोकसंख्या अनुस्चीत जातीची आहे यात ३,२८,७९७ ताटके पुरुष आणि ३,११,६८६ इतक्या स्त्रीया होत्या. नांदेड जिल्ह्याचा विचार करता यात सुमारे८.३८ टक्के लोक अनुसूचित जातीचे होते.त्यांच्या प्रमाणाचा विचार करता त्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक असल्याने संबंधित संशोधनामध्ये अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

शासनाने या लोकांना प्रदान केलेल्या जमिनीचे म्हणजेच हाडकी आणि हाडोळा यांचे क्षेत्रफळ तुलनेने कमी असल्याने मोठी गुंतवणूक किंवा नगदी पिके शक्यतो घेतली जात नाहीत आणि जी घेतली जातात त्यामध्ये अनेक समस्या उद्भवतात.अनुसूचित जातीतील जे लोक नोकरी किंवा व्यवसाय करतात त्यांच्याकडे जमिनीचे प्रमाण आपल्याच जातीतील इतर लोकांच्या तुलनेत थोडे जास्त आहे.असे असले तरी ते नोकरीनिमित्त बाहेरगावी राहत असल्याने, त्यांना स्वतःला शेती करणे शक्य होत नाही.त्यांच्या जमिनी मोठ्या बागायतदारांकडून बटाईने करून घेतल्या जातात.तरकाहींच्या जमिनी आर्थिक अडचणींमुळे गहाण टाकाव्या लागतात.यासारख्या आर्थिक व इतर समस्यांना या लोकांना सामोरे जावे लागते. त्यामुळे या संशोधनात अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजना, त्यांची सामाजिक व आर्थिक समस्या, तसेच या शेतकऱ्यांच्या वैयक्तिक आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रस्तावना:

आजच्या जीवन पद्धतीत सर्वच क्षेत्रांमध्ये अगदी झपाट्याने बदल होत आहे. त्यामुळे सर्वजण सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, क्षेत्रामध्ये श्रेष्ठ दाखविण्याचा प्रयत्न करत आहे. तसे पाहिले तर ती आवश्यक बाब आहे. परंतु समाजातील असा ही एक घटक आहे की, तो मुख्य प्रवाहापासून दूर आहे. अनुसूचित जातीतील काही जाती आज सुधारत आहे. परंतु ही सुधारणा अतिशय मंद आहे या लोकांसाठी शासन विविध योजनामार्फत आर्थिक मदत देण्यासाठी योजना राबविते परंतु या योजनांचा लाभ काही मर्यादित शेतकऱ्यांनाच मिळतो. परंतु बहुसंख्य शेतकरी त्यापासून वंचित राहतात त्यामुळे या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत नाही. नांदेड जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०.४२२ चौ.कि.मी. आहे.राज्याच्या एकूण क्षेत्रफळाचा विचार करतानांदेड जिल्ह्याचा अकरावा क्रमांक आहे.तर लोकसंख्येचा विचार करता नांदेड जिल्ह्याचा राज्यात चौथा क्रमांक आहे. २०११च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात दर चौ.की.मी. ला ३१९ इतकी लोकसंख्येची घनता आहे.जिल्ह्यात एकूण १६०३ खेडी आहेत.हीखेडी एकूण १६ तालुक्यात विभागलेली आहेत.या प्रत्येक खेड्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे.अनुसूचित जातीच्या लोकांना शासनाकडून हाडकी, हाडोळा या जमिनी प्रदान करण्यात आलेल्या आहेत.त्या जमिनींचा वापर करून अनुसूचितजातीचे शेतकरी शेतामध्ये विविध पिके घेतात.यामध्ये बरीच पिके पावसावर अवलंबून आहेत.पाण्याचे पुरेसे स्त्रोत नसणे, शेती मशागतीसाठी भांडवल नसणे, शेतीसाठी आवश्यक साधने नसणे यासारख्या अनेक समस्या या लोकांना भेडसावत असतात. तसेच शासन या शेतकऱ्यांसाठी वेळोळी काही योजना जाहीर करत असते परंतु या योजना या शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही सहजीकच या शेतकर्यांना या योजनांचा लाभ मिळत नाही त्यामुळे या शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत नाही म्हणून संबधित अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास या संशोधनातून केला जाणार आहे

संशोधन साहित्याचा आढावा:

१. ''प्रा. सरवदे अशोक शिवाजी'' यांच्या '' अनुसूचित जातीचे आर्थिक व सामाजिक अध्यन'' या शोध प्रबंधात त्यांनी अनुसूचित जातीच्या संदर्भात असे म्हटले आहे की, या लोकांचा प्रमुख व्यवसाय

शेती असून त्यांची शेतीही पावसावर अवलंबून आहे तसेच अनुसूचित जातीच्या सामाजाची आर्थिक स्थिती विषयी असे म्हटले आहे की, २०.७२% एवढ्या लोकांकडे उदरनिर्वाहासाठी शेती आहे तसेच या बहुतांशी लोकांची शेती ही पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांकडे आधुनिक स्वरुपाची अवजारे नाहीत. बहुतांश कुटुंबाना इतरांच्या अवजारांवर अवलंबून रहावे लागते. परंतु त्यांनी या शोध निबंधात या शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचा विचार केलेला दिसत नाही.

२. “पूजा मंडळ” यांच्या अनुसूचित जातीच्या समस्या या विषयावरील शोध निबंधात त्यांनी अनुसूचित जातीच्या संदर्भात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, या सारख्या समस्या मांडलेल्या आहेत.परंतु यामध्ये अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या समस्यांचा विचार केलेला दिसत नाही म्हणून संबधित संशोधनामध्ये नाशिक जिल्यातील अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जाणार आहे.

उद्दिष्टे:

१. अनुसूचित जातीया संकल्पनेत समाविष्ट होणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

२. अनुसूचित जातीतीलशेतकऱ्यांच्या वैयक्तिक आर्थिक समस्या जाणून घेणे.

३. अनुसूचित जातीतीलशेतकऱ्यांसाठी शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

४. अनुसूचित जातीच्याशेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

गृहितके:

1.अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांचेशेतीशी संबंधीतअसणाऱ्या व्यवसायामध्ये वाढ होत आहे.

2.अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांनाआर्थिक मदत मिळत नसल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

3.अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांनाशासनामार्फत विविध योजनांचा लाभ मिळाल्याने काही शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.

4. अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि व्यवसायामध्ये वाढ होत आहे

संशोधन पद्धती:

नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतीलशेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करणार आहे.

१) **प्राथमिक साधने:**

प्राथमिक साधनांमध्ये प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, प्रश्नावली भरून घेणे,निरीक्षण यासारख्या घटकांचा वापर करून संबंधितसंशोधन उपयोगी माहिती प्राप्त करणार आहे.

तसेच प्राथमिक माहिती संकलनात नमुना निवड पद्धतीचा वापर करून नांदेड जिल्ह्यातील१६ तालुक्यांतील प्रत्येकी ५ गावाची निवड करून प्रत्येक गावातून ५ नमुने निवडून एकूण ४०० नमुने माहिती संकलनासाठी वापरले जाणार आहे.

२) **दुय्यम साधने:**

तर दुय्यम साधनांमध्ये वर्तमानपत्रे, मासिके,संदर्भ पुस्तके,इंटरनेट,विविध संस्थांनी प्रकाशित केलेली कागदपत्रे, लेख, दस्तऐवज व शासनाकडून वेळोवेळी प्रकाशित होणाऱ्या माहिती साधनांचा वापर करणार आहोत.

संशोधन विषयाचे महत्व:

भारतामध्ये पूर्वीपासूनच जातीय व्यवस्था अस्तित्वात आहे.या जातिव्यवस्थेत अस्पृश्य किंवा दलित म्हणून गणल्या जाणाऱ्या जातींची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे.याच जातींना कायदेशीर आधार देताना अनुसूचित जाती म्हणून संबोधले जाते. २०११ च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यातील जवळजवळ ८.३८ टक्के लोकसंख्या अनुसूचित जातीची आहे.भारतीय राज्यघटनेत देखील अनुसूचित जातीच्या विकासासाठी आरक्षणाच्या विविध तरतुदी केल्या आहेत.परंतु आज सत्तर वर्षाच्या अवधीत या अनुसूचित जातींचा पाहिजे तितका विकास झाल्याचे दिसत नाही.यामध्ये काही मूठभर लोक

सुशिक्षित, शैक्षणिक,आर्थिक बाबतीत सक्षम असले तरी, मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जातीतील लोक हे आर्थिक विवंचनेत आहे. त्यामुळे ते आपली शेती चांगली व आधुनिक पद्धतीने करू शकत नाही. तसेच त्यांची सामाजिक स्थितीही तितकी सक्षम नाही.म्हणून नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतीलशेतकऱ्यांची आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक स्थिती कशी आहे.याचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण वाटते.म्हणून संबंधितसंशोधनास प्रारंभ करीत आहोत.

तसेच आर्थिकदृष्टया मागास अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या विकासासाठी भारत सरकार प्रयत्न करीत आहे. त्यासाठी अनेक शासकीय योजना राबविल्या जात आहे. परंतु त्यांचा योग्य असा फायदा आजही अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना झालेला नाही. त्यामुळे त्यांना शेती करण्यासाठी आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणूनंच नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास हा विषय निवडण्यात आला आहे. त्यामुळे या संशोधनाचा उपयोग महाराष्ट्र सरकार, जिल्हा प्रशासन, विविध संशोधन संस्था, संशोधक मंडळी, तसेच अनुसूचित जातीच्या शेतकऱ्याकरिता ध्येय धोरणे राबविण्यासाठी हे संशोधन कार्य उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे या संशोधन विषयास महत्त्व आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा”

संबंधित संशोधनाचे क्षेत्र महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीत समाविष्ट होणाऱ्या महार (बौद्ध), मातंग, ढोर, चांभार, खाटीक या जातीपुरती मर्यादित आहे.

१. सदर संशोधन केवळ नांदेड जिल्ह्यातील तालुक्यापुरते मर्यादित आहे
२. संशोधनासाठी नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार असल्यामे संशोधनाची मर्यादा वाढू शकते.
३. संशोधन फक्त नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीतीलमहार (बौद्ध), मातंग, ढोर, कहार, चांभार, खाटीक या जातीपुरते मर्यादित असल्याने इतर ठिकाणी त्याचे निष्कर्ष लागू पडतीलच असे नाही.

प्रकरणांची संभाव्य रचनाः

प्रकरण पहिले:प्रस्तावना.

प्रकरण दुसरेः संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे: नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती.

प्रकरण चौथे: नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे शेतकरीआणि शासकीय विकास योजना.

प्रकरण पाचवे: माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण.

प्रकरण सहावे:निष्कर्ष व शिफारशी.

- संदर्भसूची
- परिशिष्ट

संशोधनाचे वार्षिक नियोजनः

१. प्रथम वर्ष: अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

२. द्वितीय वर्ष: अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या मुलाखती व प्रश्नावली भरून घेणे.

३. तृतीय वर्ष: माहितीचे संकलन आणि विश्लेषण, निष्कर्ष व शिफारशी.

4. चौथे वर्ष: प्रबंध तयार करणे.

संदर्भसूची:

१. "शासकीय योजना" अंकुश चिंतामण, सुधीर अडसूळ प्रशांत सावंत, सिद्धेश्वर मोरे, युनिक पुणे.

२. "शेतकऱ्यांसाठी शासकीय अर्थसहाय्याच्या अन्य व विविध योजना" मनोज आवाळे, चौधरी प्रकाशन, जळगाव पुणे.

३. "कृषी अर्थसहाय्य योजना" श्री. जगन्नाथ शिंदे, गोदावरी प्रकाशन, नाशिक.

४. "शासकीय कर्ज योजना" मनोज पाटील, चौधरी ला, जळगाव, पुणे.

५. "भारतीय अर्थव्यवस्था" निर्मल देसाई आणि भालेराव, निराली प्रकाशन, पुणे, २०१५.

६."महाराष्ट्रातील जातीसंस्था विषयी विचार" प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९८.

७. "बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे आर्थिक व सामाजिक अध्ययन" प्रा. सरवदे अशोक शिवाजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

८.https://www.quora.com/How-many-villages-are-there-in-India.

९. https://www.censusindia.co.in/district/nashik-district-maharashtra-516.

१०. http://www.yourarticlelibrary.com/society/problems-of-scheduled-castes-in-india-short-essay/4083

संशोधक

प्रा.संतोष एकनाथ कर्डक

एस.व्ही.के.टी. कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय देवळी कॅम्प जि. नाशिक.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पी.एस.जाधव

सहाय्यक प्राध्यपक, वाणिज्य विभाग, बहिरजी स्मारक महाविद्यालय वसमत,नांदेड.